MHST050002552012

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १५४/२०१२ मधील नि.१३८ खालील आदेश</u>**
**<u>पारूबाई रत्तू माने वगैरे वि. शेवंताबाई महादेव माने मयत तर्फे वारस वगैरे</u>**

प्रतिवादी क्र.१(२) याने सदरचा अर्ज त्याचेविरुध्द झालेला “उलटतपास नाही” चा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. सदरचा दावा वादीने वाटपाकरीता दाखल केला आहे. वादीतर्फे नि.१०८,११०, ११३,११४,११९ व १२० येथे साक्षीदार सरतपास प्रतिज्ञापत्र नोंदविलेले आहेत. सदरील प्रतिवादी क्र.१(२) गैरहजर असलेने सदर साक्षीदार यांचा “उलटतपास नाही” असा आदेश मे. कोर्टांनी केलेला आहे. प्रतिवादी क्र.१(२) यांचे आई वडील वयस्कर असून ते सतत आजारी असलेने त्यांचे औषधोपचारास फार मोठा खर्च झालेने, आर्थिक अडचणीमुळे व मानसिक ताणतणावामुळे सदर दाव्याकडे दुर्लक्ष झाले होते. तसेच याबाबत वकीलांची भेट घेवून त्यांना माहिती देणेस अशक्य झाले होते. प्रतिवादी क्र.१(२) यांचे वडील दि.१६.०४.२०२६ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र.१(२) यांना मे. कोर्टात हजर राहून उलटतपास घेता आलेला नाही. प्रतिवादीतर्फे वादी व साक्षीदारांचा उलटतपास होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे न्यायदानास मदत होणार आहे. म्हणून प्रतिवादीने सदरचा अर्ज दाखल करुन उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून वादी साक्षीदार यांचा उलटतपास घेणेची परवानगीकरीता दाखल केला आहे.

०३. सदर अर्जास वादींनी नि.१४१ ला म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविली आहे. वादींचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांचे आई वडील कधीही आजारी नव्हते. प्रतिवादी यांचे वडील नदीपात्रात बुडून अपघाती मयत झालेले आहेत. त्यांची आई व स्वत: प्रतिवादी हे ठणठणीत असून शेतात कामे करीत आहेत. प्रतिवादी हा दावा चौकशीला लागलेपासून म्हणजे दि.१५.०१.२०१८ पासून कायम गैरहजर होता. प्रतिवादी यांचे वकीलांनी नि.११० ने अर्ज दिलेवरुन मे. कोर्टांनी दि.०६.०५.२०२५ रोजी नि.१११ ने प्रतिवादीस नोटीस काढूनही तो कायम गैरहजर राहिला. वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास दि.०२.०८.२०२३ रोजी दिलेला होता. कोर्टाचे नोटीस मिळूनही प्रतिवादी हजर झाला नाही, त्यांचे वकील उलटतपास घेणेसाठी हजरच राहिले नाहीत. त्यामुळे दि.०९.०७.२०२५ रोजी "उलटतपास नाही" असा आदेश झाला. वादीतर्फे नि.११३ व ११४ ने साक्षीदार क्र.२ व ३ यांचा सरतपास दाखल केला. त्यानंतर दोन्ही साक्षीदारांचा नो क्रॉस झाला. दि.२८.१०.२०२५ रोजी नो क्रॉस सेट असाईडचा अर्ज प्रतिवादीने नि.११५ ला दिला. तो मे.कोर्टांनी मंजूर केला. परंतु प्रतिवादीने कॉस्ट भरली नाही व तो कोर्टासमोर आलाच नाही. त्यामुळे पुन्हा नि.११३ व ११४ वर उलटतपास नाहीचा आदेश दि.१०.१२.२०२५ रोजी झाला.

०४. वादीचे पुढे असे कथन की, वादीने दि.१५.१२.२०२५ रोजी साक्षीदार क्र.४ व ५ यांचा सरतपास दाखल केला. त्यावर उलटतपास घेणेऐवजी दि.०७.०१.२०२६ रोजी नि.१२४ ने प्रतिवादी वकीलांनी प्रतिवादीस नोटीस काढणेचा अर्ज दिला. दि.१६.०१.२०२६ रोजी साक्षीदार क्र.४ व ५ यांचा नो क्रॉस आदेश झाला. त्यानंतर वादींनी त्यांचा तोंडी पुरावा बंद केला. दि.२५.०२.२०२६ रोजी वादीचा युक्तीवाद मे. कोर्टांनी ऐकला व दि.०२.०३.२०२६ व ०९.०३.२०२६ अशी प्रतिवादी यांचे युक्तीवादासाठी नेमली. त्यानंतरही दि.१७.०३.२०२६, २४.०३.२०२६, २८.०३.२०२६, ०२.०४.२०२६,

०९.०४.२०२६, १६.०४.२०२६, २३.०४.२०२६, ३०.०४.२०२६, ०८.०५.२०२६ अशा तारखा नेमून प्रतिवादी यांना पुन्हा पुन्हा संधी दिली. प्रतिवादीने त्याचे कथनांच्या पृष्ट्यर्थ कोणताही पुरावा न देता केवळ दाव्याचे काम लांबणीवर टाकणेसाठी सदरचा खोटा अर्ज देवून सहा साक्षीदारांच्या उलटतपासाची मागणी केलेली आहे. प्रतिवादीस पूर्ण संधी देवूनही त्यास दाव्यामध्ये रस नसलेचे दिसते. त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादीवर खर्च बसवून फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे.

०५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन करण्यात आले. सदर प्रकरण अंतिम युक्तीवादाकरीता आहे. दि.०२.०८.२०२३ रोजी साक्षीदार क्र.१ चा सरतपास दाखल केलेला आहे. प्रकरण उलटतपासाकरीता होते. प्रतिवादी हा दावा चौकशीला लागलेपासून म्हणजे दि.१५.०१.२०१८ पासून कायम गैरहजर होता. प्रतिवादी यांचे वकीलांनी नि.११० ला अर्ज दाखल केला. प्रतिवादी यांचे नुकसान होवू नये म्हणून कोर्टामार्फत दि.०६.०५.२०२५ रोजी नि.१११ ने प्रतिवादीस नोटीस काढण्यात आली. नोटीस पोहोचूनही प्रतिवादी गैरहजर राहिला. वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास दि.०२.०८.२०२३ रोजी दिलेला होता. कोर्टाचे नोटीस मिळूनही प्रतिवादी हजर झाला नाही, त्यांचे वकील उलटतपास घेणेसाठी हजरच राहिले नाहीत. त्यामुळे दि.०९.०७.२०२५ रोजी "उलटतपास नाही" असा आदेश झाला. वादीतर्फे नि.११३ व ११४ ने साक्षीदार क्र.२ व ३ यांचा सरतपास दाखल केला. त्यानंतर दोन्ही साक्षीदारांचा नो क्रॉस झाला. दि.२८.१०.२०२५ रोजी नो क्रॉस सेट असाईडचा अर्ज प्रतिवादीने नि.११५ ला दिला. तो मंजूर करण्यात आला. परंतु प्रतिवादीने कॉस्ट भरली नाही व तो कोर्टासमोर आलाच नाही. त्यामुळे पुन्हा नि.११३ व ११४ वर उलटतपास नाहीचा आदेश दि.१०.१२.२०२५ रोजी झाला. वादीने दि.१५.१२.२०२५ रोजी साक्षीदार क्र.४ व ५ यांचा सरतपास दाखल केला. त्यावर उलटतपास घेणेऐवजी

दि.०७.०१.२०२६ रोजी नि.१२४ ने प्रतिवादी वकीलांनी प्रतिवादीस नोटीस काढणेचा अर्ज दिला. दि.१६.०१.२०२६ रोजी साक्षीदार क्र.४ व ५ यांचा नो क्रॉस आदेश झाला. अशा प्रकारे वेळोवेळी संधी देवूनही व नोटीस काढूनही प्रतिवादी गैरहजर राहिलेमुळे नो क्रॉसचा आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर वादींनी दि.१६.०१.२०२६ रोजी त्यांचा पुरावा बंद केला. पुरावा देण्याकरीता संधी देवूनही प्रतिवादी गैरहजर राहिल्यामुळे व सदरचे प्रकरण हे ॲक्शन प्लॅन मधील असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाने जुनी प्रकरणे तातडीने चालविणेचे निर्देश दिलेमुळे दि.०६.०२.२०२६ रोजी प्रतिवादींचा पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर सदरचे प्रकरण अंतिम युक्तीवादाकरीता लावण्यात आले. वेळोवेळी संधी देवूनही प्रतिवादीने प्रामाणिकपणे सदरचे प्रकरण चालवलेले नाही. प्रतिवादीकडे कोणतेही संयुक्तीक कारण नाही. प्रतिवादीने अर्जातील दाखल केलेली कारणेही चुकीची आहेत. अर्जातील कथनांच्या पृष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र नाही. याकरीता वादीतर्फे मा. सर्वोच्च न्यायालय व मा. राजस्थान उच्च न्यायालय यांचे खालील न्यायनिर्णय दाखल करण्यात आले आहेत.

i) M/s. Bagai Construction Thr. Its Proprietor Lalit Bagai V. M/s. Gupta Building Material Store, AIR 2013 Supreme Court 1849.

ii) Gayathri V. M. Girish, Special Leave Petition (CC No. 14061 of 2016) on 27 July, 2016.

iii) Prahlad Das V. Karunaram and another, AIR 1999 Rajasthan 108.

०६. मा. सर्वोच्च न्यायालयाने असे निर्देशित केले आहे की, दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये प्रकरणांचा तातडीने निपटारा होण्याकरीता वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. कलम १५१ व आदेश १८ नियम १७ नुसार न्यायालयाने आपले अधिकार विचारपूर्वक

व आवश्यकतेनुसार वापरले पाहिजेत. केवळ अर्ज दाखल झाला म्हणून तो कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय मंजूर केला असे होता कामा नये. सदर प्रकरणामध्ये देखील प्रतिवादीने अर्जातील कथने शाबीत करण्याकरीता कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादीने त्यांच्या वडीलांच्या मृत्यू दाखला हजर केलेला आहे. त्यानुसार त्यांच्या वडिलांचे निधन दि.१६.०४.२०२६ रोजी झालेले आहे. परंतु त्यापुर्वीपासून प्रतिवादी विरुध्द वेळोवेळी या न्यायालयाने आदेश पारीत केले आहेत. प्रतिवादीचे वडील आजारी होते हे सिध्द करण्याकरीता कोणताही कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही. याउलट वादीने शपथेवर कथन केले आहे की, प्रतिवादीचे वडीलांचे निधन नदीपात्रात पडून अपघाती निधन झालेले आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता प्रतिवादीस संधी देणेस कोणतेही संयुक्तीक कारण अभिलेखावर नाही. नि.११५ वर झालेल्या आदेशाचे पालन प्रतिवादीतर्फे करण्यात आलेले नाही. या सर्व घटनाक्रमांचा विचार करता प्रतिवादीस संधी देणेकरीता कोणतेही संयुक्तीक कारण नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. उपरोक्त नमूद सर्व कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.06.30 17:08:28 +0530

ठिकाणः कराड ( जे.जे.माने )

दिनांकः ३०.०६.२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.